# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक ः
०२०-२५६९१३४१, २५६०१२०६

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
फॅक्स ः ०२०-२५६०१२०६
०२०-२५६९१३४१
Website : www.unipune.ac.in
e-mail : coe@unipune.ac.in

परीक्षा-समन्वय/३०५

दि. १२.०३.२०११

## तातडीचे व महत्वाचे

मा.प्राचार्य / मा.संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था

विषय- सन २०११ च्या प्रथमार्धात होणा-या विद्यापीठाच्या विविध परीक्षांसाठी वरिष्ठ पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या करण्याबाबत---

महोदय,

उपरोक्त विषयासंबंधी कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध परीक्षांसाठी अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षकांची नेमणूक संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी करावयाची असून त्याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठास कळवावयाची आहे. या संदर्भात निर्गमित केलेला नवीन अध्यादेश क्रमांक ८ ( ४ ते ९ ) मधील तरतुदींकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक (Internal Senior Supervisor) नियुक्तीचे निकष पुढीलप्रमाणे निश्चित केलेले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

१. अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नेमणूक करताना प्राधान्याने शिक्षकांची नेमणूक करावी. वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणुन नेमणुक होण्यासाठी वरिष्ठ महाविद्यालयामध्ये शिकविण्याचा किंवा प्रशासकीय कामकाजाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. प्रशासकीय कामकाजाचा अनुभव असणारा शिक्षकेतर कर्मचारी किमान वर्ग-२ मधील असावा.

२. अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नेमणुक करण्यात यावयाच्या शिक्षकांस विद्यापीठाची मान्यता असणे आवश्यक आहे.

**विद्यापीठाने बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती परीक्षा केंद्रावर येवू न शकल्यास अन्य संस्थेच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी संपर्क साधून त्यांच्या वरीष्ठ महाविद्यालयातील कमीत कमी ५ वर्षांचा शिकविण्याचा अनुभव असलेल्या शिक्षकास बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून बोलावून घ्यावे व तशी नियुक्ती करावी. तसेच सदर व्यक्ती मान्यताप्राप्त शिक्षक असणेही आवश्यक आहे.** ज्या व्यक्तीने/प्राध्यापकाने अंतर्गत/बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून काम केले आहे त्यांची माहिती, कालावधी व परीक्षेचे नांव याबाबत सविस्तर माहिती परीक्षा संपताच विद्यापीठाकडे पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी.

आपणास विनंती करण्यात येते की, विद्यापीठाच्या परीक्षांसाठी वरीलप्रमाणे बहि:स्थ पर्यवेक्षकांच्या नेमणूकीबाबत नियोजन करावे. तसेच अंतर्गत पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या वेळोवेळी करुन विद्यापीठास परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी नेहमीप्रमाणे सहकार्य करावे.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. शि.मो. आहिरे)
परीक्षा नियंत्रक